दैनिक

MAHILA SANVAD

# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर । कार्यकारी संपादक : विद्या जाधव । उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

PUNE : Volume No. 1, Issue No. 246, Marathi Daily Thursday, Date - 26 March 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २४६ वा | मराठी दैनिक | गुरूवार दि. २६ मार्च २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४



**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धामिर्क, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

महिला संवाद

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111



**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा


# पुण्यात ड्रग्जचा विळखा घट्ट

## ‘ड्रग्जमुक्त पुणे’ मोहिमेला वेग; हॉटस्पॉट भागांची यादी जाहीर

**पुणे । प्रतिनिधी**

शहर ‘ड्रग्जमुक्त’ करण्याचे प्रयत्न सुरू असतानाच पुण्यातील काही भाग अमली पदार्थांच्या विळख्यात अडकले असल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांच्या विश्लेषणात कोंढवा, येरवडा, खडकसह काही पोलिस ठाण्यांच्या हद्दीत ड्रग्ज प्रकरणे सर्वाधिक असल्याचे उघड झाल्याने आता या भागांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

पोलिस आयुक्त अमितेशकुमार आणि सह पोलिस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी मंगळवारी गुन्हे आढावा बैठक घेतली. या वेळी पोलिस ठाण्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कठोर सूचना दिल्या आहेत. ‘केवळ कारवाई न करता अमली पदार्थांच्या साखळीचा मुळापर्यंत शोध घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पोलिसांच्या विश्लेषणानुसार कोंढवा, लक्ष्मीनगर, येरवडा, काळेपडळ, खडक आणि लोणी काळभोर ही पोलिस ठाणे अमली पदार्थांच्या प्रकरणांत ‘टॉप’मध्ये आहेत. त्याचबरोबर शिवाजीनगर, डेक्कन, कोथरूड, वारजे, पर्वती, मार्केटयार्ड, बाणेर, लष्कर, मुंढवा, वानवडी, हडपसर, लोहगाव, वाघोली, खराडी, लोणीकंद, सहकारनगर या १७ पोलिस ठाण्यांच्या हद्दीतही मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थांची प्रकरणे समोर येत आहेत,’ अशी माहिती पोलिस सह आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी दिली.

प्रत्येक संबंधित पोलिस ठाण्यात स्वतंत्र ‘अँटी-ड्रग्ज पथक’ स्थापन करण्यात येणार आहे. दोन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश असलेले हे पथक ड्रग्जविरोधी कारवाईवर लक्ष ठेवणार आहे;



तसेच या पथकांना अत्याधुनिक ‘ड्रग्ज नालायझर’ यंत्रणा देण्यात येणार आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे, की केवळ साठा जप्त करण्यापुरते मर्यादित न राहता ड्रग्जचा पुरवठा कुठून होतो, कोणत्या मार्गाने येतो आणि कोणाला वितरित केला जातो, याचा सखोल तपास केला जाणार आहे. त्यासाठी शहरातील २२ पोलिस ठाण्यांच्या वरिष्ठ निरीक्षकांना विशेष जबाबदारी देण्यात आली आहे.

अमली पदार्थांची तस्करी अणि विक्री रोखण्यासाठी पोलिसांकडून आता पचा (उपयोजन) वापर करण्यात येणार असून, या पवर माहिती देणाऱ्या नागरिकांचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार आहे. नगरसेवकांना ‘माझा प्रभाग ड्रग्ज मुक्त’ या उपक्रमाशी जोडण्यात आले आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी प्रायोगिक तत्त्वावर पहिल्या टप्प्यात चार प्रभागांत हा उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

## अघोरी पूजेतून मुख्यमंत्री हटवण्याचा कट? आव्हाडांचा विधानसभेत स्फोटक दावा

**मुंबई । प्रतिनिधी**

देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रिपदावरुन दूर करण्यासाठी राज्यातील काही आमदारांनी अघोरी पूजेचा घाट घातला होता. अशोक खरात यानेही या संबंधित नेत्यांना फडणवीसांना मुख्यमंत्रीपदावरुन दूर करु, असे आश्वासन दिल्याचा सनसनाटी दावा आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला. ते बुधवारी विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेवेळी बोलत होते. यावेळी जितेंद्र आव्हाड यांनी अशोक खरात आणि महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांबाबत अनेक स्फोटक दावे केले.

अशोक खरात याला वाचवण्यासाठी २००७ साली पहिला बळी पत्रकार बाळू तुपे याचा देण्यात आला. त्यावेळी या प्रकरणाची नाशिकमध्ये प्रचंड चर्चा होती. वृत्तपत्रातही याबाबत लेख छापून आले होते. त्यामुळे अशोक खरात कोण हे पोलिसांना माहिती नव्हते, अशातला भाग नव्हता. या सगळ्या आरोपींना वाचवण्यासाठी पोलिसांनी किती पैसे घेतले ते फक्त देवेंद्र फडणवीस साहेबांना माहिती आहे. अनेक बडे अधिकारी खरातच्या समोर लोटांगण घ्यायचे, त्यांनी खरातला वाचवण्यासाठी बरेच पैसे घेतले, असा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला.



जितेंद्र आव्हाड यांनी देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रीपदावरुन दूर करण्यासाठी काळी जादू आणि अघोरी विद्येच्या माध्यमातून प्रयत्न सुरु असल्याचा आरोपही केला. ते म्हणाले की, मी खात्रीने सांगतो, अशोक खरातच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीला सुरुंग लावण्यासाठी काहीजण प्रयत्न करत होते. हे सर्वजण अशोक खरातकडे पूजा घालायला गेले होते. वेळ आल्यावर मी त्यांचे नाव उघड करेन. ही सगळी माहिती सहा महिन्यांपूर्वी मुख्यमंत्र्यांना मिळाली होती. या नेत्यांच्या खरातसोबत बैठका झाल्या होत्या. तेव्हा अशोक खरात म्हणाला होता, ’मला थोडे दिवस द्या, मुख्यमंत्री घरी गेलेले असतील.’

अशाप्रकारच्या काळ्या जादूला आपण राज्यमान्यता देणार असू, सरकारी पैसा देणार असू, ईशान्येश्वर मंदिरासाठी कमानी बांधल्या, टाक्या बांधल्या, हा अशोक खरात इतका मोठा कोण होता? मला एका गोष्टीचे वाईट वाटतंय की, या तुकारामांच्या महाराष्ट्रात, ज्ञानेश्वरांच्या महाराष्ट्रात, शिवरायांच्या महाराष्ट्रात आपण काळ्या जादूला इतकी मान्यता देतोय. राजकारणात काळ्या जादूने काहीही होऊ शकते, असे समस्त आमदारांना वाटू लागले आहे. माझ्याकडे ३८ आमदारांची लिस्ट आहे, त्यांनी अशोक खरातकडे जाऊन करंगळ्या कापल्या होत्या. परवा विधानभवनात सगळे आमदार एकमेकांची बोटं तपासून पाहत होते, तू खरातकडे जाऊन आलास का, विचारत होते. ही परिस्थिती महाराष्ट्रात आहे. या बाबासाठी सरकाराचा पैसा जातोय, रस्ते बनवले जात आहेत. शिक्षण खाते, म्हाडा, एसआरए सगळ्या पोस्टिंग खरातकडून केल्या जात आहेत. हे काय सुरु आहे? अशोक खरातच्या ट्रस्टच्या सदस्य असणाऱ्यांना अजून अटक का झाली नाही, असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केला.

## सोलार पंप बिघाडामुळे पाण्याचा प्रश्न गंभीर; पिकांचे नुकसान, शेतकऱ्याची तक्रार

**मानवत । प्रतिनिधी**




तालुक्यातील मु. लोहारा, पोस्ट मंगरुळ येथील शेतकरी निलावंती रामा रोडगे यांचा सोलार पंप २ मार्चपासून शॉर्ट सर्किट प्रोटेक्शन ही समस्या दाखवत बंद आहे. त्यामुळे शेतातील पिकांना पाणी मिळत नसून पिकांचे नुकसान होत आहे.

हा पंप प्रधानमंत्री कुसुम योजनेतून बसविण्यात आला असून तो सीरम (डएएठ-च्) कंपनीकडून बसवण्यात आला आहे. मात्र, पंप बंद झाल्यानंतर कंपनीकडून वेळेत दुरुस्ती होत नसल्याची शेतकऱ्याने तक्रार केली आहे. पंप बसवताना मोठी आश्वासने देतात, मात्र नंतर दुर्लक्ष करतात, असे रोडगे यांनी सांगितले.

या बाबत १० मार्च रोजी ऑनलाईन तक्रार केली होती. पण त्यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने त्यांनी महावितरण कार्यालय, मानवत येथे जाऊन तक्रार अर्ज दिला आहे.सध्या शेतीचा हंगाम सुरू असून पाण्याअभावी पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकरी अडचणीत आला आहे. पंप लवकरात लवकर दुरुस्त करून चालू करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी गतिमान प्रशासनातून पिंपरी चिंचवड शहराचा विकास साधतील - महापौर रवि लांडगे

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची आज अर्थसंकल्पीय विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तपदी नव्याने रूजू झालेले डॉ. विजय सूर्यवंशी यांची ही पहिलीच सर्वसाधारण सभा असल्याने त्यांचा सभागृहाला परिचय करून देण्यात आला. पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त म्हणून यशस्वी कामकाज करण्यासाठी महापौर रवि लांडगे यांनी त्यांना पुस्तक भेट देऊन शुभेच्छा दिल्या. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी गतिमान प्रशासनातून पिंपरी चिंचवड शहराचा विकास साधतील, असा विश्वास महापौर रवि लांडगे यांनी यावेळी व्यक्त केला. पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडलेल्या या विशेष सभेला उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी माई पठारे, शहर सुधारणा समिती सभापती संजय नाना काटे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर तसेच नगरसदस्य, नगरसदस्या, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विशेष सभेत सुरुवातीला आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांचा परिचय करून देण्यात आला. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे शालेय शिक्षण जि. प. शाळा, देवळा तसेच सैनिक स्कूल, सातारा येथे पूर्ण केले आहे. ते २००६ बॅचचे भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) अधिकारी



असून त्यांनी विविध महत्त्वाच्या पदांवर काम करत प्रशासनात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी यापूर्वी महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ येथे सह मुख्य कार्यकारी अधिकारी (माहिती तंत्रज्ञान), जिल्हा परिषद कोल्हापूर व पालघर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, गोंदिया व रायगड येथे जिल्हाधिकारी, तसेच भारताचे संरक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे. याशिवाय त्यांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त, मुंबई येथे अतिरिक्त महानगर आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त तसेच कोकण विभागाचे विभागीय आयुक्त अशी महत्त्वाची पदे भूषविली आहेत, अशी माहिती परिचयामध्ये देण्यात आली. तसेच आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना प्रशासकीय काळात मिळालेले पुरस्कार आणि त्यांनी केलेली विशेष कामगिरी याबाबत देखील सविस्तर माहिती देण्यात आली. प्रास्ताविक महापालिकेचे विशेष अधिकारी किरण गायकवाड यांनी केले.

### आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना मिळालेले पुरस्कार

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर येथे कार्यरत असताना, सन २०१५ मध्ये राज्यस्तरीय यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कार, तसेच देशपातळीवरील रु. २५ लाखांचा पुरस्कार प्राप्त. कोल्हापूर येथे कार्यरत असताना, प्राथमिक आरोग्य केंद्राचा सुधार करण्यासाठी कायापालट अभियान प्रथमच सुरुवात केली, जी आता राष्ट्रीय पातळीवर कायाकल्प पुरस्कार म्हणून राबविली जात आहे. रायगड जिल्हाधिकारी असताना रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी केलेल्या प्रयत्नास राज्यस्तरीय प्रथम पारितोषिक. जिल्हाधिकारी गोंदिया असताना, नरेगाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उत्कृष्ट श्रेणीचा पुरस्कार.

मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते स्मार्ट सिटी-२०२० अंतर्गत गृहनिर्माण मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्फत आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये कल्याण-डोंबिवली महापालिकेला कोविड इनोव्हेशन पुरस्कार. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत कार्यरत असताना एम.ई.डी.ए. यांनी आयोजित केलेल्या १६ व्या राज्यस्तरीय ऊर्जा संवर्धन स्पर्धेमध्ये महापालिका इमारती व रुग्णालयामध्ये ऊर्जा संवर्धन, स्ट्रीट लाईट, पाणीपुरवठा व जलनिस्सारण पुरस्कार प्राप्त. स्मार्ट सिटी मिशन, गृहनिर्माण मंत्रालय, भारत सरकार यांनी आयोजित केलेल्या फ्रिडम-टू-वॉक व सायकल स्पर्धेमध्ये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील नागरिकांनी उत्कृष्ट आरोग्यासाठी भाग घेतला, त्यात देशात प्रथम क्रमांक मिळवला. महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात क्षेत्रीय कार्यालयांमध्ये विभागीय आयुक्त, कोकण विभाग कार्यालयाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त.

### आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची आतापर्यंतची विशेष कामगिरी :

कोल्हापूर येथे कार्यरत असताना, जिल्हा परिषद संचलित देशातील पहिली निवासी क्रीडा प्रशाला सुरू केली. गेल्या ८ वर्षांमध्ये ५५० पेक्षा जास्त राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील पदके या शाळेतील विद्यार्थ्यांनी प्राप्त केली आहेत. गोंदिया येथे कार्यरत असताना, दुर्मिळ अशा सारस पक्षाचे संवर्धन करण्यासाठी देशातील नामांकित छायाचित्रकारांना निमंत्रित करून सारस महोत्सव आयोजित केला आणि धानाच्या शेतात सारस पक्षाने टाकलेल्या अंड्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शेतकऱ्यांना ‘सारस मित्र’ पुरस्कार सुरू केला. यातून सारस पक्षाचे संवर्धन होण्यास खूप मदत झाली. गोंदिया येथे बेघर असलेले व राज्यभर भटकंतीमुळे स्वतःचा पत्ता नसलेल्या नाथजोगी समाजाला मालकीची घरे देऊन स्वतःची वस्ती निर्माण करून दिली.

## थोडक्यात...

### नवी मुंबईत ‘महालक्ष्मी सरस’ प्रदर्शनास उत्साहात सुरुवात; सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये ‘मिनी महाराष्ट्र’ अवतरला

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई आणि नवी मुंबईकरांसाठी आनंदाची पर्वणी घेऊन आलेल्या ‘महालक्ष्मी सरस’ प्रदर्शनाचे भव्य उद्घाटन वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये जल्लोषात झाले. महिला शक्तीच्या उत्साहात हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले झाले आहे. महालक्ष्मी सरस प्रदर्शन ३ एप्रिलपर्यंत सकाळी दहा ते रात्री दहा या वेळेत सुरू राहणार आहे. वातानुकुलित असलेल्या या प्रदर्शनात विनामूल्य प्रवेश आहे.

उदघाटन सोहळ्याला अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, नवी मुंबईच्या महापौर सुजाता सुरज पाटील, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर, मुख्य परिचालन अधिकारी निखिलकुमार ओसवाल, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सलूजा सुतार आदी मान्यवर उपस्थित होते.

नवी मुंबईच्या महापौर सुजाता सुरज पाटील म्हणाल्या की, आज महिला प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत. मुंबई आणि नवी मुंबईकरांच्या दारी ही मोठी संधी चालून आली आहे. ग्रामीण भागातील बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळवून देणे आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करणे हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी नवी मुंबई महापालिका सर्वतोपरी मदत करील असे सुजाता पाटील म्हणाल्या. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी महिलांच्या प्रगतीचा गौरव केला. महामंडळाच्या माध्यमातून महिलांना जास्तीत जास्त आर्थिक पाठबळ देण्यासाठी महामंडळ सक्षम आहे. सरसला मिळणारा प्रतिसाद उत्स्फूर्त असून उलाढाल सातत्याने वाढत आहे. राज्यातील सर्व महामंडळे एकत्र करून कर्ज वाटपाची संकल्पना आम्ही राबवण्याचा विचार करीत आहोत.

ज्यामुळे महिलांचा सहभाग आणि उत्साह अधिक वाढेल,असे नरेंद्र पाटील म्हणाले. उमेदचे सीईओ नीलेश सागर म्हणाले, ‘ महालक्ष्मी सरसने महिलांच्या पंखात बळ दिले आहे. आता आमचे उद्दिष्ट राज्यातील एक कोटी महिलांना ‘लखपती दीदी’ करण्याचे आहे. ‘४२०० हून अधिक उत्पादने आता ऑनलाइन व्यासपीठावर उपलब्ध असून आंतरराष्ट्रीय स्तरावर मार्केटिंग आणि पॅकेजिंगमध्ये मोठी सुधारणा झाली आहे. उमेदचे मुख्य परिचलन अधिकारी निखीलकुमार ओसवाल यांनी आभार मानले.

वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये आयोजित ‘महालक्ष्मी सरस’ हे प्रदर्शन महिलांच्या जिद्दीचा उत्सव आहे. इथले प्रत्येक उत्पादन युनिक आहे.मग ते हाताने विणलेले कापड असो, घरगुती मसाले असोत की हस्तकलेच्या वस्तू. महालक्ष्मी सरस प्रदर्शनात ४९० स्टॉल्स लावण्यात आले आहेत. यामध्ये उत्पादन वस्तूंचे स्टॉल्सः ४२० (स्टार्ट-अप क्रांती आणि बचत गटांची उत्पादने) तर खाद्यपदार्थ स्टॉल्स ७० आहेत. विविध राज्यातील अस्सल चवींची मेजवानी या ठिकाणी मिळणार आहे.

## संपादकीय...

# ड्रग्जविरोधात करडी नजर

पुणे शहराला 'ड्रग्जमुक्त' करण्याचा प्रशासनाचा निर्धार जितका महत्त्वाकांक्षी आहे, तितकाच तो आव्हानात्मकही आहे. शहराच्या काही भागांमध्ये अमली पदार्थांचे जाळे खोलवर रुजले असल्याचे पोलिसांच्या विश्लेषणातून स्पष्ट झाले आहे. कोंढवा, येरवडा, खडक यांसारख्या भागांमध्ये वाढती प्रकरणे ही केवळ आकडेवारी नसून, ती शहराच्या सामाजिक आरोग्यावरील गंभीर इशारा आहे. विशेष म्हणजे, ही समस्या आता विशिष्ट भागांपुरती मर्यादित न राहता अनेक परिसरांमध्ये पसरत असल्याचे चित्र दिसत आहे. ड्रग्जचा प्रश्न हा केवळ कायदा व सुव्यवस्थेचा मुद्दा नाही, तर तो सामाजिक, आर्थिक आणि मानसिक पातळीवर परिणाम करणारा बहुआयामी प्रश्न आहे. युवकांमध्ये वाढणारी व्यसनाधीनता ही केवळ त्यांच्या आरोग्यालाच नाही, तर त्यांच्या कुटुंबांच्या स्थैर्यालाही धोका निर्माण करते. शिक्षण, करिअर आणि सामाजिक जबाबदाऱ्या यांकडे दुर्लक्ष होऊन एक संपूर्ण पिढी चुकीच्या मार्गावर जाण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे ही समस्या केवळ पोलिसांच्या कक्षेत ठेवून चालणार नाही; ती संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. पोलिसांनी घेतलेली आढावा बैठक आणि त्यानंतर जाहीर केलेल्या उपाययोजना निश्चितच सकारात्मक आहेत. अँटी-ड्रग्ज पथकांची स्थापना, अत्याधुनिक उपकरणांचा वापर, तसेच पुरवठा साखळीचा मुळापर्यंत शोध घेण्याचे आदेश हे सर्व योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे. मात्र, यामध्ये सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अंमलबजावणीतील सातत्य आणि पारदर्शकता. अनेक वेळा अशा मोहिमा प्रारंभी जोरात सुरू होतात, परंतु कालांतराने त्यांची तीव्रता कमी होते. हीच बाब टाळणे गरजेचे आहे. ड्रग्जचा पुरवठा हा केवळ स्थानिक पातळीवर मर्यादित नसून, तो अनेकदा आंतरराज्य किंवा आंतरराष्ट्रीय साखळीशी जोडलेला असतो. त्यामुळे या समस्येवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी विविध यंत्रणांमध्ये समन्वय आवश्यक आहे. सीमावर्ती तपासणी, गुप्तचर यंत्रणांची मदत, तसेच डिजिटल माध्यमातून होणाऱ्या व्यवहारांवर लक्ष ठेवणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. विशेषतः सोशल मीडिया आणि एन्क्रिप्टेड प्सच्या माध्यमातून होणारी ड्रग्जची देवाणघेवाण ही नवी आव्हाने निर्माण करत आहे. नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी सुरू करण्यात येणारे प हे एक प्रभावी साधन ठरू शकते. माहिती देणाऱ्यांची ओळख गोपनीय ठेवली जाणार असल्याने अधिक लोक पुढे येण्याची शक्यता आहे. मात्र, यासाठी नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करणे अत्यावश्यक आहे. पोलिस आणि नागरिक यांच्यातील दरी कमी झाली, तरच अशा उपक्रमांना यश मिळू शकते. 'माझा प्रभाग ड्रग्जमुक्त' ही संकल्पना देखील स्थानिक पातळीवर जनसहभाग वाढवण्यासाठी उपयुक्त ठरू शकते, परंतु ती केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात राबवली गेली पाहिजे. यासोबतच, प्रतिबंधात्मक उपाययोजनांकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. शाळा, महाविद्यालये आणि कार्यस्थळांवर जनजागृती कार्यक्रम राबवणे, व्यसनमुक्ती केंद्रांची उपलब्धता वाढवणे आणि मानसिक आरोग्य सेवांना बळकटी देणे आवश्यक आहे. युवकांना सकारात्मक पर्याय उपलब्ध करून देणे-जसे की क्रीडा, कला, कौशल्यविकास-यामुळे ते चुकीच्या मार्गापासून दूर राहू शकतात. तसेच, ड्रग्जविरोधी लढ्यात केवळ छोटे विक्रेते किंवा वापरकर्त्यांवर कारवाई करून चालणार नाही. या साखळीतील मोठे मास्टरमाइंड, आर्थिक पुरवठादार आणि संघटित गुन्हेगारीशी संबंधित घटक यांच्यावर कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, एका ठिकाणी कारवाई झाली तरी दुसऱ्या ठिकाणी हे जाळे पुन्हा उभे राहते. एकूणच, पुण्यातील वाढती ड्रग्ज समस्या ही शहराच्या सुरक्षिततेसाठी आणि भविष्यासाठी गंभीर इशारा आहे. प्रशासनाने सुरू केलेली मोहीम ही योग्य दिशेने टाकलेले पाऊल असले, तरी तिचे यश हे सातत्यपूर्ण प्रयत्न, प्रभावी अंमलबजावणी आणि समाजाच्या सक्रिय सहभागावर अवलंबून आहे.

# 'उमेद'च्या साथीने 'अन्नपूर्णा फूड एड प्रॉडक्टस' ची लक्षवेधी घौडदौड

व्यक्तीच्या क्षमतांना योग्य मार्गदर्शन, आर्थिक पाठबळ आणि संधींची साथ मिळाली तर तो स्वतःच्या यशस्वी वाटचालीतून, इतरांना प्रेरणा देणारा दिशादर्शक ठरणारा माईलस्टोन प्रवास करतो, याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे ग्रामविकास विभागातंर्गत ग्रामीन जीवनोन्नती अभियानातून यशस्वी वाटचाल करणाऱ्या अनेक सेल्फमेड उद्योजिका, ज्यांना उद्योग क्षेत्राची, व्यवसायाची कुठलीही पार्श्वभूमी नसताना आज घडीला त्यातील किती तरी जणीचे उद्योग व्यवसाय हे लाखांच्या वर आर्थिक उलाढाल करत आहेत.

नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यातील रेणापूरच्या मीराबाई स्वय सहायता संघ, संविधान महिला ग्रामसमूह, सिद्धिविनायक प्रभागसंघ, पाळज येथील इयत्ता १० वी नापास असलेल्या विशेष म्हणजे उद्योगाची कुठलीही पार्श्वभूमी नसलेल्या अन्नपूर्णा फूड अँड प्रॉडक्ट्सच्या सर्वे सर्वा सुनीता अशोक कावळे यांचा उद्योजिका म्हणून सुरु असलेला यशस्वी प्रवास प्रेरणादायी आणि अभिनंदनीय आहे.

सुनीता कावळे त्यांच्या अन्नपूर्णा फूड एड प्रॉडक्स अंतर्गत ११ प्रकारची आवळ्याची उत्पादने बनवतात. त्यांनी आपल्या व्यवसायाची सुरुवात केली ती फक्त ५०० रुपयाच्या भांडवलावर आणि आजघडीला अन्नपूर्णा फूड प्रॉडक्टस ९ लाखा रुपयांपर्यंतची उलाढाल करत आहे. विशेष उल्लेखनीय म्हणजे प्रतिकूल परिस्थितीत स्वावंलबनाचा मार्ग शोधण्याच्या धडपडीत आवळ्यासारख्या आरोग्यवर्धक फळातून खाद्य पदार्थ तयार करुन त्याच्या विक्रीतून काही करता येईल या विचाराने अवघ्या पाचशे रुपयात व्यवसाय करु पाहणाऱ्या सुनीता यांचा प्रवास सोपा नव्हता, कारण आर्थिक पाठबळ तर काही नव्हतेच मात्र त्यांच्या आत्मविश्वासाला पूरक पाठिंबा देणारे वातावरण ही घरात नव्हते उलट अवतीभवतीच्या महिलांकडूनही त्यांच्या या प्रयत्नांना टिकेच्या नजरेतून बघितल्या गेले, त्यांच्या धडपडीला गांभिर्याने घेतल्या गेले नाही, तर उलट त्यांना हे जमू शकणार नाही, असे म्हटले गेले, मात्र त्यांच्या मुलींने त्यांना प्रोत्साहन देत पाठिंबा दिल्याने त्या हिमतीने आपल्या व्यवसायात जम बसवण्यासाठी प्रयत्न करत राहिल्या.




आज अकरा प्रकारच्या पदार्थांची निर्मिती करणाऱ्या अन्नपूर्णा फूड प्रॉडक्टस्ची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या सुनीता यांनी २०१७ साली आवळ्यावर प्रक्रिया करून छोटेसे उत्पादन सुरू केले. गावात सहज मिळणाऱ्या कच्च्या मालावर आधारित आवळा कँडी, मुरंबा, चूर्ण, लोणचं इत्यादी पदार्थ बनवण्यास त्यांनी सुरवात केली.

प्रत्येक गोष्ट त्यांनी स्वतःच्या हातांनी बनवली. या व्यवसायासाठी आवश्यक कच्चा माल असलेला आवळा आणण्यासाठी त्यांना बरीच मेहनत घ्यावी लागली, कधी कधी तर ५०, ६० कि.मी. लांबपर्यंत जाऊन आवळा आणण्यापासून ते तो वाळवणे, त्याच्यापासून उत्पादन तयार करण्यासाठीची सर्व मेहनत घेऊन तो तयार माल बाजारपेठेत विक्री करण्यापर्यंतची सर्व प्रक्रिया पार पाडत पुढे जात असताना सुनीता यांना अनेक अडथळे, अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र तरी त्या जिद्दीने पुढे जात राहिल्या, त्यांच्या या संघर्षात त्या २०१९ मध्ये उमेद (एमएसआरएलएम) अभियानाच्या माध्यमातून जोडल्या गेल्या. याठिकाणी त्यांच्या उद्योग उभारणीच्या प्रयत्नांना व्यावसायिक कौशल्य देणारे ब्रँडिंग, पॅकेजिंग, मार्केटिंग याची उपयुक्त माहिती देणारे प्रशिक्षण मिळाले.

सरस प्रदर्शनातून उत्पादनाची सरस विक्री

ग्रामविकास विभागाच्या मार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सुनीता यांना विक्रमी विक्रीचा अविस्मरणीय अनुभव प्रत्यक्ष घेता आला, या प्रदर्शनात अन्नपूर्णा फूड प्रॉडक्टसच्या उत्पादनांना ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला त्यातून सुनीता यांनी आपल्या उत्पादनांची थोडी थोडकी नव्हे तर थेट १२ लाख रुपयांची विक्री केली, रेणापूर तालुक्यातील छोट्याशा गावातून सुरु केलेल्या व्यवसायाच्या उत्पादनांची इतकी मोठी विक्री होणे हे त्यांचे मोठे यश होते, कारण या विक्रीतून त्यांचा आत्मविश्वास वृद्धीगंत होऊन उद्योगाचे नवीन दालन त्यांच्यासमोर खुले झाले. व्यापक स्वरुपातील बाजारपेठेची ओळख आणि प्रत्यक्ष सहभागी होण्याचा अनुभव त्यांना पुढील वाटचालीसाठी निश्चितच प्रेरणा देणारा आहे.

आपल्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या सुनीता यांना व्यवसाय वाढवण्यासाठी शासन योजनांच्या माध्यमातून उत्तम सहकार्य मिळत असून (पीएमएफएमई) योजना, शासकीय अनुदान, मशिनरी, पॅकेजिंग यूनिट यासाठी अर्थसहाय्य मिळण्यासाठीची प्रक्रिया त्यांनी सुरु केली आहे. आवळ्याचे उत्पादन आरोग्यदायी आहे, त्याला मोठी मागणी आहे, आणि भविष्यात 'अन्नपूर्णा' हा ब्रँड संपूर्ण भारतात पोहोचेल या विश्वासातून कार्यरत सुनीता यांचा हा प्रेरणादायी प्रवास इतरांच्या उमेदीला निश्चितच बळ देणारा आहे.

आपल्याला स्वावलंबनाची मिळालेली संधी अन्य महिलांच्या ही वाट्याला यावी, ही प्रामाणिक इच्छा असेलल्या सुनीता यांना स्वतःच्या यशाप्रमाणे इतर महिलांनीही यशाची चव चाखावी, असे प्रकर्षाने वाटत. म्हणूनच त्यांनी महिलांना विशेषतः विधवा, परित्यक्ता, गरजू महिलांना स्वअनुभवातून व्यवसायाचे मार्गदर्शन केले, त्यांच्या हाताला काम दिले. एक बाई सक्षम झाली, की ती इतरांना मदतीचा हात देऊ शकते. या व्यापक जाणीवेतून सुनीता यांच 'अन्नपूर्णा' हे केवळ फूड ब्रँड नाही, तर महिलांना स्वाभिमानाने उभे करणारे एक व्यासपीठ आहे. आर्थिक, शैक्षणिक भांडवलाचा अभाव असताना अडचणींतून मार्ग काढत स्वकष्टाने आणि जिद्दीने सुनीता यांनी इथपर्यंतचा गाठलेला टप्पा हा निश्चितच यशाच्या प्रवासातील मैलाचा दगड आहे.

**- वंदना थोरात, वरिष्ठ सहायक संचालक,**
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

# दिव्यांग बालकांसाठी 'अंगणवाडी प्रोटोकॉल'चे मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते विमोचन

**मुंबई । प्रतिनिधी**

दिव्यांग बालकांना सामान्य बालकांप्रमाणेच जीवन जगता यावे आणि समाजात त्यांच्याबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण व्हावा, यासाठी अंगणवाडीच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात आहेत. दिव्यांग बालकांसाठी अंगणवाडी प्रोटोकॉल हा ० ते ६ वयोगटातील बालकांसाठी महत्वपूर्ण ठरणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे 'प्रारंभिक शिक्षणातून विकसित भारताची पायाभरणी' या विषयावर पूर्व प्राथमिक शिक्षण राज्यस्तरीय परिसंवादाचे आयोजन एकात्मिक बालविकास सेवा योजनेतर्फे करण्यात आले होते. दिव्यांग बालकांसाठी 'अंगणवाडी प्रोटोकॉल' विमोचन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.

या परिसंवादात राज्यातील विविध तज्ज्ञ सहभागी झाले होते. मुख्य सचिव राजेश अग्रवाल, आयुक्त माधवी सरदेशमुख, उपायुक्त विजय क्षीरसागर, सहआयुक्त संगीता लोंढे तसेच रॉकेट लर्निंगचे सह-संस्थापक सिद्धांत सचदेवा यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात रॉकेट लर्निंगच्या 'ई-आकार कुशल अंगणवाडी' उपक्रमांतर्गत कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर व नागपूर विभागातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका आणि बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. परिसंवादात धोरण ते अंमलबजावणी, बालकांच्या आयुष्यातील पहिले १००० सुवर्णमयी दिवस, तसेच परिणामकारकतेसाठी भागीदारी मॉडेल यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, राज्यातील प्रत्येक गावापर्यंत अंगणवाडी सेवा पोहोचवून पोषण भी - पढाई भी हा उद्देश




साध्य करण्यासाठी महिला व बालविकास विभाग कार्यरत आहे. नवीन शिक्षण धोरणानुसार बालस्नेही वातावरणात शिक्षण देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. रॉकेट लर्निंगच्या माध्यमातून अंगणवाडी सेविकांना आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे प्रशिक्षण दिले जात असून त्यामुळे शिक्षण अधिक प्रभावी आणि सुलभ होत आहे.

दिव्यांग बालकांसाठी तयार करण्यात आलेल्या प्रोटोकॉलद्वारे अंगणवाडी सेविकांना अशा मुलांना शिक्षण देण्याची पद्धत, त्यांच्याशी समानतेने वागण्याचे महत्त्व आणि इतर मुलांमध्ये समावेशकतेची भावना निर्माण करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच बालकांमधील व्यंग लवकर ओळखून उपचारासाठी मार्गदर्शन, योग्य पोषणाविषयी माहिती आणि बालस्नेही शिक्षण देण्यासाठी व्हिडिओ स्वरूपात शिक्षण आणि सामग्री सर्व अंगणवाड्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. याशिवाय, राज्यातील सर्व दिव्यांग बालकांची माहिती संकलित करून आरोग्य विभाग आणि दिव्यांग कल्याण विभागाशी समन्वय साधून त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यावरही भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी राज्यातील शेवटच्या बालकापर्यंत पोषण व शिक्षण सेवा पोहोचवण्यासाठी अधिकाधिक प्रभावी व सर्वोत्तम उपाययोजना करण्यात येत असल्याचे व्यक्तव्य केले.

## वाडीवऱ्हे येथील बजाज इलेक्ट्रॉनिक्स कामगार प्रकरणी ३१ मार्चपर्यंत लेखी निवेदनांचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील वाडीवऱ्हे येथील मे. बजाज इलेक्ट्रॉनिक्स लि. मधील कामगारांच्या स्वेच्छानिवृत्ती प्रकरणाचा कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी आढावा घेतला. कामगारांवर अन्याय होऊ नये, यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे कामगार मंत्री फुंडकर यांनी स्पष्ट केले.



कंपनी प्रशासन व कामगार प्रतिनिधींनी आपले लेखी म्हणणे ३१ मार्चपर्यंत सादर करावे, असे निर्देश कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी बैठकीत दिले.

फेब्रुवारी २०२४ मध्ये कंपनीने स्वेच्छानिवृत्ती योजना जाहीर केली होती. संबंधित कामगारांकडून सक्ती झाल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला असून, व्यवस्थापनाने सध्याच्या परिस्थितीत मूळ पदांवर काम उपलब्ध नसल्याने पर्यायी स्वरूपात इतरत्र काम देण्याची तयारी दर्शविली आहे.

कामगार उप आयुक्त कार्यालयामार्फत प्रकरणाचा पाठपुरावा सुरू असून, सर्व बाबींचा विचार करून न्याय्य निर्णय घेतला जाईल, असे मंत्री आकाश फुंडकर यांनी नमूद केले.

बैठकीस आमदार सीमाताई हिरे, प्रधान सचिव आय ए कुंदन, कामगार आयुक्त डॉ एच पी तुम्मोड तसेच संबंधित अधिकारी, कामगार प्रतिनिधी आणि कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## मनोरा आमदार निवाससाठी ५५.५० कोटींच्या विकास शुल्कासह वाढीव खर्चाला मंजुरी

**मुंबई । प्रतिनिधी**

'मनोरा' आमदार निवास पुनर्बांधणी प्रकल्पासंदर्भात विधान भवन येथे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक झाली. प्रकल्पाच्या वाढीव खर्चासह बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ५५ कोटी ५० लाख रुपयांच्या विकास शुल्कास बैठकीत मंजुरी देण्यात आली. यावेळी विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, अपर मुख्य सचिव (सा.बां.वि) मिलिंद म्हैसकर, मुख्य अभियंता प्रज्ञा वाळके, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव



(१) जितेंद्र भोळे, मेघना तळेकर इटकेलवार सचिव (२), शिवदर्शन साठ्ये (४) आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

प्रकल्पाची कामे निश्चित वेळेत आणि गुणवत्तेशी तडजोड न करता पूर्ण व्हावीत, यासाठी संबंधित यंत्रणांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून कार्यवाही करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

या इमारतींचे बांधकाम सध्या प्रगतीपथावर असून पहिल्या इमारतीचे १९ मजले तर दुसऱ्या इमारतीचे २० मजल्यांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. हा संपूर्ण प्रकल्प फेब्रुवारी २०२८ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. नूतन मनोरा आमदार निवासची इमारत आधुनिक सोयी-सुविधांनी युक्त असेल. यामध्ये स्वतंत्र व सुसज्ज निवासस्थान तसेच इमारतीमध्ये मिनी थिएटर, अत्याधुनिक जिम, सुसज्ज उपहारगृहे आणि अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असतील, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

# 'प्रामाणिक तपास झाला तर मंत्रीही अडकतील' - सपकाळ

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकमधील विकृत भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात राज्य सरकारने प्रामाणिकपणे कारवाई केली तर सध्याच्या मंत्रिमंडळातील एक डझन मंत्री तुरुंगात जातील, असा स्फोटक दावा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. देवेंद्र फडणवीस यांना या सगळ्या अघोरी उद्योगांची कुणकुण काही महिन्यांपूर्वीच लागली होती. अखेर हे अघोरी उद्योग खूपच वाढल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी अशोक खरात याच्यावर कारवाईचा बडगा उगारला, असे हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले. त्यांनी बुधवारी सोशल मीडियावर केलेल्या एका पोस्टमध्ये याबाबत भाष्य केले आहे.

सरकारने भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात प्रामाणिकपणे कारवाई केली तर डझनभर मंत्री आणि दोन डझन अधिकारी जेलमध्ये जातील. अशोक खरातच्या इशानेश्वर मंदिराला देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने २०१८ साली १.५ कोटी रुपयांचा निधी दिला होता. फडणवीसांच्या कार्यालयात त्यावेळी कार्यरत असणारे व आता म्हाडाचे अधिकारी मिलिंद बोरीकर यांचे ही या बाबांशी अत्यंत जवळीकीचे संबंध आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचेही भोंदू सोबत फोटो समोर आले आहेत. मंत्री चंद्रकांत पाटील यांचे ही या भोंदू खरातशी अत्यंत जवळचे संबंध होते त्यांनीही मुख्यमंत्री होण्यासाठी या बाबाकडून अघोरी पूजा केल्याची



माहिती असल्याचे हर्षवर्धन सपकाळ यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भोंदू बाबाचे कारनामे सहा महिन्यांपासून माहित होते. फडणवीसांच्या आजूबाजूचे लोक, मंत्रीमंडळातील सहकारी यांचे खरातशी संबंध असल्यानेच माहिती मिळूनही फडणवीसांनी काही कारवाई केली नव्हती. पण त्यांच्या मित्रपक्षातील सहकाऱ्यांनी देवेंद्र फडणवीस यांचे मुख्यमंत्रीपद घालवण्यासाठी खरातकडून तंत्र मंत्र व अघोरी पूजा केल्यानेच फडणवीसांनी भोंदू बाबा अशोक खरात विरोधात कारवाई सुरु केली. भोंदू बाबाच्या निमित्ताने ते आता मित्र पक्ष आणि पक्षातील हितशत्रूंना ब्लॅकमेल करत आहेत, असा आरोपही हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. अशोक खरात याला मंगळवारी नाशिक सत्र न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी सरकारी वकिलांनी अशोक खराने पाच नरबळी दिल्याचा संशय व्यक्त केला. त्याच्या तपासासाठी पोलिसांनी अशोक खरातची सात दिवसांची पोलीस कोठडी मागितली होती. मात्र, न्यायालयाने त्याची पाच दिवसांच्या पोलीस कोठडीत रवानगी केली होती. सरकारने भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात प्रामाणिकपणे कारवाई केली तर डझनभर मंत्री आणि दोन डझन अधिकारी जेलमध्ये जातील. अशोक खरातच्या इशानेश्वर मंदिराला देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने २०१८ साली १.५ कोटी रुपयांचा निधी दिला होता.

## थोडक्यात

### मानवत येथील उभे महादेव पार्वतीचा आज विवाह

**मानवत । प्रतिनिधी**

परभणी जिल्ह्यामधील मानवत येथे उभा महादेव पार्वती चे मंदिर असून असे मंदिर भारतातील एकमेव मंदिर आहे.या मूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे दिवसातून तिन्ही वेगवेस चेहऱ्यावरील हावभाव बदलतात. उभा महादेव पार्वतीचे स्वयंभू मंदिर असून हे साडे चारशे वर्षांपूर्वीचे आहे. येथील सत्पुरुष गंगाधर बापू स्वामी हे खूप मोठे शिव भक्त होते. त्यांना एकेदिवशी महादेवाने दृष्टांत दिला. की तुझे वास्तव्य आहे त्या ठिकाणी विहीरचे खोदकाम चालू कर विहीरीचे खोदकाम चालू असताना त्यांना एका मोठ्या दगडी शिळा खाली उभे असलेले महादेव पार्वती ची एकाच दगडात असलेली मूर्ती सापडली. महादेवाची मूर्ती साडे चार फुट उंची ची व पार्वती ची साडे तीन फुट उंची ची आहे. व त्या खाली चार फुटाचा नंदी सापडला. सत्पुरुष ब्रम्हचारी गंगाधर बापू स्वामी यांनी या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा मंदिरामध्ये केली. प्रत्येक महादेव मंदिरासमोरील नंदी हा बसलेला असतो. पण येथील नंदी देखील महादेव पार्वती प्रमाणे उभा आहे. या मंदिराचे बांधकाम वावऱ्या पध्दतीचे आहे.या मंदिरामध्ये वर्षभर विविध कार्यक्रम होतात. चैत्र शुद्ध अष्टमीला उभा महादेव पार्वती च्या विवाहाची परंपरा आहे. तसेच एक दिवस आधी महादेव पार्वती ला हाळद लावली जाते.विवाह लावण्यापूर्वी शहरातून शेवंती काढण्यात येते.

दुपारी भाविकांसाठी, लग्न वऱ्हाडी मंडळींसाठी मिष्टान्नाची पंगत दिली जाते. व नंतर सायंकाळी उभा महादेव पार्वती चा विवाह लावला जातो. तसेच यावर्षी २५ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ०६:४५ वाजता विवाह संपन्न होणार आहे. या वर्षाचे यजमान हेमा कुंजबिहारी काबरा आहेत.

### आमखेडा गावात संत श्री. रूपलाल महाराज यांची पुण्यतिथी साजरी

**सोयगाव । प्रतिनिधी**

आमखेडा येथील जुनी ग्रामपंचायत समोर दि.२३ सोमवारी सकाळी संत श्री. रूपलाल महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.दरम्यान संत श्री रूपलाल महाराज यांच्या प्रतिमेस मुकेश मिसाळ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी डॉ. रघुनाथ फुसे, डॉ. नाना पायघन प्रा. डॉ. गणेश मिसाळ, ज्ञानेश्वर खलसे, प्रकाश ढगे, शांताराम मिसाळ, सुखदेव ढगे,समाधान आगे, अर्जुन बोडखे, गणेश कापरे, संजय आगे, संतोष ढगे, निलेश मिसाळ, संजय मिसाळ, देवेंद्र तेलंग्रे, रामचंद्र फुसे, अमृत बोडखे, ज्ञानेश्वर ढगे, सुधाकर ढगे, शंकर राऊत, शांताराम आगे, नामदेव राऊत, अर्जुन ढगे,अशोक कोथळकर आदींसह बारी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रवना ग्रामपंचायतीला गटविकास अधिकाऱ्यांची भेट; कामकाजाचा सविस्तर आढावा

**घनसावंगी । प्रतिनिधी**

तालुक्यातील रावणा ग्रामपंचायतीला गटविकास अधिकारी प्रदीप कदम यांनी नुकतीच भेट देत ग्रामपंचायतीच्या एकूण कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. या भेटीदरम्यान त्यांनी ग्रामपंचायतीतील विविध विभागांची पाहणी करून सुरू असलेल्या विकासकामांची माहिती घेतली तसेच प्रलंबित कामांबाबतही संबंधितांना मार्गदर्शन केले.

ग्रामपंचायतीच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत त्यांनी नोंदी व कागदपत्रांची तपासणी करत कर वसुलीची स्थिती, पाणीपुरवठा योजना, स्वच्छता उपक्रम, ग्रामविकास योजना तसेच शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी याबाबत सविस्तर चर्चा केली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज योजनेचा आढावा घेत संबंधित कामांच्या प्रगतीबाबत माहिती घेतली.यावेळी नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांमध्ये कोणतीही दिरंगाई होऊ नये, यासाठी कामकाज अधिक गतिमान व पारदर्शक ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच, प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचविण्याचे निर्देशही त्यांनी कर्मचाऱ्यांना दिले. ग्रामपंचायतीच्या परिसराची पाहणी करताना स्वच्छता, पाणी व्यवस्थापन तसेच इतर मूलभूत सुविधांबाबतही त्यांनी सूचना केल्या. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी स्थानिक पातळीवर नियोजनबद्ध काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

# पुणे-नाशिक महामार्गावर भीषण अपघात; एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू, दोन मुले जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे-नाशिक महामार्गावर मंचर (ता. आंबेगाव) येथे खासगी बस व कारची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील तीन जणांचा जागीच मृत्यू झाला असून, दोन मुले जखमी झाली आहेत. एकाच वेळी आई-वडिलांसह आजीचंही छत्र हरपल्याने किशोरवयीन मुलं पोरकी झाली आहेत.

मल्लिकार्जुन शिवराज आंबेगावे (वय ४८), त्यांच्या पत्नी आरती (वय ४०) व त्यांच्या आई लता तूपलोंढे (वय ६३, रा. तिघेही चिंतामणी कॉलनी, वाल्हेकरवाडी चिंचवड) अशी मृतांची नावे आहेत. आंबेगावे यांची मुलगी मृणाल (वय १६) आणि मुलगा प्रेम (२०) हे जखमी असून, त्यांच्यावर मंचर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती स्थिर आहे, अशी माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली.

मल्लिकार्जुन आंबेगावे नाशिकहून एक कार्यक्रम उरकून पिंपरी-चिंचवडकडे घराकडे परतत होते. मंचरजवळील एकलहरे येथे रात्री अकरा वाजता त्यांचा कारवरील ताबा सुटल्याने ती दुभाजक ओलांडून थेट विरुद्ध दिशेने पुण्याकडून नाशिककडे जाणाऱ्या खासगी बसवर जाऊन आदळली. ही धडक एवढी भीषण होती, की कारचा चक्काचूर झाला आणि ती बसच्या खाली घुसली. अपघातात तिघांचाही जागीच मृत्यू झाला होता. कार बसखाली अडकल्यामुळे कारमधील प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी कसरत करावी लागली. सर्वांना तातडीने मंचर उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. तेथील डॉक्टरांनी तपासून तिघांना मृत घोषित केले.



बसचालक राजू चत्रू राठोड (वय ३८, रा. उजळत, ता. शहादा, जि. नंदुरबार) याने मंचर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. या अपघातात आंबेगावे यांचा मुलगा व मुलगी बचावले असून, त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. खासगी बसमधील काही प्रवासी किरकोळ जखमी आहेत, अशी माहिती मंचर पोलिस ठाण्याचे निरीक्षक श्रीकांत कंकाळ व सहायक फौजदार सनील धनवे यांनी दिली. पोलिसांनी आंबेगावे यांच्याविरोधात निष्काळजीपणे वाहन चालविल्याबद्दल गुन्हा दाखल केला आहे.महामार्गावरील सुधारणांची कामे बाकी असल्यामुळेच व महामार्गाची रचना सदोष असल्याने या भागात वारंवार अपघात होतात, असा आरोप येथील स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे.

या अपघातात मल्लिकार्जुन आंबेगावे आणि त्यांच्या पत्नी आरती मृत्युमुखी पडले. त्यांची दोन्ही मुले वाचली. मात्र, आई-वडिलांचे छत्र हरपल्याने ही मुले पोरकी झाली. आई-वडिलांबरोबरच आजीलाही गमावण्याची वेळ या मुलांवर आली. त्यामुळे परिसरातून हळहळ व्यक्त करण्यात आली.

## भोंदू बाबा अशोक खरात प्रकरण तापले; बच्चू कडूंचा पलटवार, 'बदनामीचा कट'

**मुंबई । प्रतिनिधी**

महिलांचे लैंगिक शोषण करणारा भोंदू बाबा अशोक खरात सध्या पोलिसांच्या ताब्यात आहे. दररोज त्याची कसून चौकशी केली जात आहे. अनेक राजकीय नेते अशोक खरातच्या संपर्कात असल्याची माहिती समोर आली आहे. या यादीत आता प्रहारचे प्रमुख बच्चू कडू यांचे नावही समाविष्ट झाले आहे. भोंदू बाबा अशोक खरात आणि बच्चू कडू यांचा एक व्हिडिओ समोर आला आहे. यात खरात बच्चू कडू यांना, 'मला तुम्हाला एकच गोष्ट म्हणायची आहे, जेंव्हा तुम्ही इगझ मध्ये मंत्री असाल तेंव्हा तुम्ही इथे या! असं म्हणत आहे. यावर आता बच्चू कडू यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

बच्चू कडू म्हणाले की, भोंदू बाबाचा आम्ही निषेध करतो, आम्हाला कार्यकर्त्यांनी महादेवाच्या मंदिरात नेलं त्या ठिकाणी ते भोंदू बाबा होते. त्यांनी त्या ठिकाणी माझा सत्कार केला, ते माझ्यापेक्षा मोठे असल्याने संस्कृती प्रमाणे मी त्यांच्या पाया पडलो. आम्हाला माहित असतं की हे महाराज कामाचा नाही, पण समाज मन जपण्यासाठी आम्ही जातो, मात्र आम्ही



त्याचा निषेध करतो.

पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले की, त्या महाराजांकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गृहमंत्री अमित शहा गेले, एकनाथ शिंदे ,विखे पाटील तिथे गेले पण तुम्ही मी त्यांना विचारलं का? कोणत्या सीड्या बाहेर काढायच्या हे भाजपने ठरवलं आहे, इतर लोक गेले पण त्यांना विचार नाही बच्चू कडू गरीब आहे म्हणून तुम्ही विचारत आहे. बच्चू कडूंना बदनाम करण्याचा अजेंडा बीजेपी कार्यालयाकडून आला आहे.

बच्चू कडू पुढे बोलताना म्हणाले की, 'त्या भोंदू बाबांनी जे सांगितलं त्यांचं पूर्ण विधान चुकीचं निघालं, मी त्यावेळेस उद्धव ठाकरें यांच्या मंत्रिमंडळात मंत्री होतो. खरात सोबतची माझी भेट अचानक झाली, कार्यकर्त्यांसोबत मी गेलो, त्या ठिकाणी माझा सत्कार झाला ती माझी चूक नाही, पण ते व्हिडिओ काढून मला बदनाम करण्याचं काम भाजपची टीम करत आहे.

पुढे बच्चू कडू म्हणाले की, 'आसाराम बापूच्या भेटीला पंतप्रधान नरेंद्र मोदी सुद्धा गेले, भाजपचे मोठे चार नेते आसाराम बापू सोबत नसताना सुद्धा आहे, मग त्यांचा राजीनामा घ्यावा लागणार नाही का? ते झाकून ठेवायचं आणि इतर लोकांचा राजीनामा घ्यायचा, कोणासोबत कोणाचा फोटो असला म्हणजे त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात टाकणं चुकीचं आहे. दरम्यान, यावेळी बच्चू कडू यांनी अशोक खरात यांना जे जे भाजपचे नेते भेटले त्यांचे फोटो दाखवले. यात गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राधाकृष्ण विखे पाटील यांचा समावेश आहे.

## महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार सोहळा मुंबईत २५ व २६ मार्च रोजी

**मुंबई । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे देण्यात येणारा महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार वितरण सोहळा २५ व २६ मार्च २०२६ रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे संपन्न होणार असल्याची माहिती प्रादेशिक उपायुक्त, बाळसाहेब सोळंकी यांनी दिली.

२५ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता गेटवे ऑफ इंडिया ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह दरम्यान व्यसनमुक्ती दिंडी काढण्यात येणार आहे. त्यानंतर उद्घाटन सोहळा, व्यसनमुक्ती विषयावरील विविध चर्चासत्रे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे करण्यात आले आहे. तसेच, २६ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता पुरस्कार वितरण सोहळा




यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे पार पडणार आहे.

या पुरस्कार सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष ड.राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे तसेच विभागाच्या आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमात व्यसनमुक्ती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १०० व्यक्ती आणि १३ संस्थांना महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे. यामध्ये लेखक, कवी, पत्रकार, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, शासकीय कर्मचारी आणि सेवाभावी संस्थांचा समावेश आहे.

## अटींचा फेरा सोडा, ७/१२ कोरा करा; अन्यथा बेमुदत उपोषण - रामप्रसाद खरात यांचा इशारा

**घनसावंगी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने अर्थसंकल्पात जाहीर केलेली २ लाखांची कर्जमाफी ही शेतकऱ्यांच्या अपेक्षांची पूर्तता करणारी नसून, ती केवळ दिखावा असल्याचा आरोप करत 'राजीव गांधी पंचायत राज संघटन'चे प्रदेश सरचिटणीस रामप्रसाद माणिकराव खरात यांनी सरकारला कडक इशारा दिला आहे. ३० सप्टेंबर २०२५ ही जाचक अट तात्काळ रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, अन्यथा घनसावंगी तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण छेडण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



आज (२३ मार्च) घनसावंगी येथे तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री, सहकार मंत्री व कृषी मंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना खरात यांनी सरकारच्या धोरणांवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, कर्जमाफी जाहीर करूनही ३० सप्टेंबर २०२५ ही 'कट-ऑफ डेट' लावल्यामुळे नियमित कर्जफेड करणारे आणि २०२५ मधील अतिवृष्टीमुळे अडचणीत सापडलेले लाखो शेतकरी योजनेपासून वंचित राहिले आहेत. सध्या बँका वसुलीसाठी दबाव टाकत असून, शेतकरी अडचणीत सापडला आहे.

वेळेवर कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही ५० हजारांऐवजी सरसकट २ लाखांचे प्रोत्साहन अनुदान द्यावे. २०१७ व २०१९ च्या कर्जमाफीतील १९ लाख ५६ हजार पात्र शेतकऱ्यांचे सातबारा तातडीने कोरे करावेत. २ लाखांपेक्षा जास्त कर्ज असलेल्या शेतकऱ्यांसाठी 'वन टाइम सेटलमेंट' (जढड) योजना लागू करावी. ३० जूनपर्यंत बँकांची सक्तीची वसुली थांबवण्याचे लेखी आदेश द्यावेत.

## अशोक खरातच्या फार्महाऊस कर्मचाऱ्याची साक्ष समोर

**नाशिक । प्रतिनिधी**

महिला लैंगिक अत्याचारातील आरोपी आणि स्वतःला कॅप्टन म्हणून मिरवणाऱ्या अशोक खरातची गेल्या ४ दिवसांपासून एसआयटी चौकशी सुरू आहे. दरम्यान, एसआयटीच्या चौकशीत दररोज नवनवे खुलासे समोर येत आहेत. तसेच, दुसरीकडे पीडित महिलाही समोर येत असून खरातविरुद्ध गुन्हा दाखल करत आहेत. परिणामी भोंदूबाबाचे पाय आणखी खोलात असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. अशातच अशोक खरातच्या फार्महाऊसवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याची देखील एसआयटीनं चौकशी केलीय. यावेळी आजवर त्यांनी काय काय बघितलं? हे डखढ चौकशीनंतर सगळं सांगितलंय.

दोन दिवसांपूर्वी घराच्या फार्म हाऊसवरच्या या कर्मचाऱ्याची चौकशी झाली होती. त्यांनतर या कर्मचाऱ्यांनी दिली पहिली प्रतिक्रिया देतांना सांगितलं कि, गेल्या सहा महिन्यांपासून मी कामाला आहे. मला याबाबत काहीच कल्पना नव्हती. मी



सहा महिन्यापासून फॉर्म हाऊसवर काम करतोय. यात शेती बघणे, झाडांना पाणी घालणं , गार्डन बघणं, बंगल्याची साफ सफाई करणे हे काम मी करतो. १७ एकरात हा फार्म हाऊस उभारलाय. अशोक खरात हे महिन्यातून ३ ते ४ वेळेस बंगल्यावर यायचे, कधी फॅमिलीसोबत यायचे तर कधी एकटे यायचे.

चार दोन पाहुणे खरात साहेबांना भेटायला यायचे आणि काही वेळाने निघून जायचे. आम्ही नवरा बायको इथे काम करतो. आता जे प्रकार त्यांच्याबाबत समोर आला आहे त्याबाबत मला काहीही कल्पना नव्हती. मला कधी याबाबत शंका देखील आली नाही. असे म्हणत खरातच्या बंगल्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यानं प्रतिक्रिया दिलीय.

दरम्यान, अशोक खरात विरोधात एकूण ६ गुन्हे दाखल झाले असून नव्याने ३ तक्रार दाखल झाल्या आहेत. भोंदू अशोक खरात विरोधात दाखल तक्रारीत एका विद्यार्थिनीचा देखील समावेश आहे. नराधम अशोक खरातने विद्यार्थिनीशी गैरवर्तन केल्याचे उघडकीस आले आहे. दरम्यान, सिन्नरच्या मिरगाव येथे मंदिर उभारून खरातने आपला 'दरबार' सुरू केला होता.

ज्योतिष, अंकशास्त्र, पूजाविधी यांच्या नावाखाली तो लोकांच्या समस्या सोडवण्याचा दावा करत असे. अपत्यप्राप्ती, वैवाहिक अडचणी, नोकरी, राजकीय भविष्य अशा कारणांनी अनेकजण त्याच्याकडे जात असत. त्यात राजकीय नेते, अधिकारी, उद्योजक आणि कलाकारांचाही समावेश असल्याची माहिती समोर आली आहे.

# सरकारी कार्यालयात दहशत! संगमनेरमध्ये अधिकाऱ्यावर हल्ला

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथे पंचायत समिती कार्यालयात घडलेल्या मारहाणीच्या घटनेमुळे खळबळ उडाली आहे.

तालुका अभियान व्यवस्थापकावर कार्यालयात घुसून काही जणांनी बेदम मारहाण केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या संपूर्ण प्रकाराचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने प्रकरण अधिकच चर्चेत आले आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, काही व्यक्तींनी थेट पंचायत समिती कार्यालयात प्रवेश करत संबंधित अधिकाऱ्यावर हल्ला केला. या हल्ल्यात कर्मचाऱ्याला गंभीर दुखापत झाली असून, घटनेच्या वेळी कार्यालयात एकच गोंधळ उडाला. उपस्थित कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रकरणी रात्री उशिरा संगमनेर शहर पोळी ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शरद नाना थोरात यांच्यासह ९ ते १० जणांविरोधात गुन्हा




नोंदवण्यात आला आहे. विशेष म्हणजे, शरद थोरात हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांचे चुलत बंधू असल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, मारहाणीमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले, तरी शासकीय कामात अडथळा आणणे, मारहाण करणे यांसारख्या गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू असून, आरोपींचा शोध घेण्याचे काम वेगाने सुरू आहे. दरम्यान, सरकारी कार्यालयात घुसून कर्मचाऱ्याला मारहाण झाल्याने प्रशासन आणि कर्मचाऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्नही उपस्थित झाला असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, सोनई जवळील खेडले परमानंद येथे नाचताना धक्का का दिला? या कारणावरून मारहाण केल्याप्रकरणी तिघांवर सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. १३ मार्च रोजी दुपारी २ वा. खेडले परमानंद गावातील मारुती मंदिरासमोर फिर्यादी उभे असताना नाचताना धक्का का दिला? असे म्हणून शिवीगाळ करून हातातील गज व स्टीलच्या कड्याने डोक्यात व लाथाबुक्यांनी मारहाण करून जखमी केले व पुन्हा आमच्या नादी लागला तर तुला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिल्याची फिर्याद सुनिल ज्ञानदेव बर्डे (रा. शिरेगाव) यांनी सोनई पोलीस ठाण्यात दिल्याने आर्यन बर्डे, शुभम बर्डे, आदित्य वैरागर (सर्व रा. खेडले परमानंद तालुका नेवासा) यांच्यावर सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस पुढील तपास करीत आहे.

## संक्षिप्त

### परतुर येथे श्रीराम नवमी निमित्त भव्य शोभायात्रेचे आयोजन

**परतूर । प्रतिनिधी**

श्रीराम नवमीच्या पावन निमित्ताने परतूर येथे हिंदू एकता दिवस २०२६ उत्साहात साजरा करण्यात येणार असून यानिमित्ताने गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ रोजी भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही शोभायात्रा यंदा १३व्या वर्षात पदार्पण करत असून परिसरात मोठ्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणजे अयोध्या येथील श्रीरामलल्ला यांची ८ फूट उंच भव्य बाल स्वरूपातील श्रीमूर्ती असणार आहे. याशिवाय प्राचीन कालीन संबळ पथक, बाहुबली नरसिंह अवतार, भव्य ध्वज पथक, आकर्षक धून, पुष्पवर्षा व दिव्य आतिषबाजी यांसारख्या विविध आकर्षणांची मेजवानी उपस्थितांना अनुभवायला मिळणार आहे.

ही शोभायात्रा दुपारी ३.३० वाजता धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज उड्डाणपूल येथून सुरू होऊन श्री खंडोबा मंदिर (गाव भाग) येथे समारोप होणार आहे. सायंकाळी ५.३० वाजता श्री महादेव मंदिर चौक येथे भव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन समस्त बांधव यांच्या वतीने करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

### आमदार हिकमत उढाण यांची ठाम व अभ्यासपुर्ण भूमिका

**घनसावंगी । प्रतिनिधी**

घनसावंगी मतदारसंघाचे आमदार हिकमत उढाण यांनी विधानसभेत विविध महत्त्वाच्या व प्रलंबित प्रश्नांवर ठाम व आक्रमक भूमिका घेत सरकारचे लक्ष वेधले. शेतकरी, सर्वसामान्य नागरिक तसेच विविध समाजघटकांच्या समस्या प्रभावीपणे मांडत त्यांनी तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. त्यांच्या या मांडणीमुळे सभागृहात घनसावंगी मतदारसंघाचा आवाज बुलंद झाल्याचे दिसून आले.

आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना आमदार उढाण यांनी धनगर, बंजारा आणि मुस्लिम समाजाच्या प्रलंबित मागण्यांकडे विशेष लक्ष वेधले. अनेक वर्षांपासून या समाजांचे प्रश्न प्रलंबित असून त्यांना न्याय मिळावा, यासाठी शासनाने सकारात्मक व ठोस निर्णय घ्यावा, अशी ठाम मागणी त्यांनी केली. समाजातील दुर्बल घटकांना न्याय देणे ही शासनाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. दरम्यान, कृषी क्षेत्राशी संबंधित 'महाडीबीटी' पोर्टलमधील तांत्रिक अडचणींचा मुद्दाही त्यांनी सभागृहात उपस्थित केला. कृषी यांत्रिकीकरण योजनेत निवड झालेल्या अनेक शेतकऱ्यांना 'पूर्व संमती' टॅब बंद असल्यामुळे लाभ मिळण्यात अडथळे येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण असून हा टॅब तात्काळ सुरू करून प्रक्रिया सुरळीत करावी, अशी मागणी त्यांनी केली.

घरकुल योजनेतील निधी वितरणाच्या प्रक्रियेत ठइख-डछ--डझ-ठडक प्रणालीमुळे होत असलेल्या विलंबावरही त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. लाभार्थ्यांना वेळेत निधी मिळत नसल्यामुळे घरकुलांचे काम रखडत आहे. ही समस्या सोडवण्यासाठी 'सिंगल विंडो ट्रॅक सिस्टम' लागू करून निधी वितरण प्रक्रिया सुलभ व गतिमान करावी, अशी सूचना त्यांनी शासनाला केली. तसेच, जालना जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पिकांचे नुकसान, आर्थिक तोटा आणि निर्माण झालेली बिकट परिस्थिती लक्षात घेता बाधित शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत जाहीर करून दिलासा द्यावा, अशी आग्रही मागणी आमदार उढाण यांनी सभागृहात केली. पंचनामे जलदगतीने पूर्ण करून मदत लवकरात लवकर पोहोचवावी, असेही त्यांनी सांगितले. एकूणच, विविध प्रश्नांवर अभ्यासपूर्ण आणि ठाम मांडणी करत आमदार हिकमत उढाण यांनी शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि समाजातील विविध घटकांच्या हक्कासाठी विधानसभेत प्रभावी आवाज उठवला. त्यांच्या या भूमिकेमुळे संबंधित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधले गेले असून लवकरच सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पीडित कुटुंबांना मिळाला शासकीय सेवेचा आधार




**जालना । प्रतिनिधी**

अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (ट्रॉसिटी) दाखल झालेल्या गंभीर प्रकरणांतील दिवंगत व्यक्तींच्या वारसांना शासनाने मोठा दिलासा दिला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार जालना जिल्ह्यातील अशा ८ पात्र वारसांची शैक्षणिक अर्हतेनुसार वर्ग-४ पदावर निवड करण्यात आली आहे. बुधवार दि.२५ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित एका विशेष कार्यक्रमात या लाभार्थ्यांना नियुक्ती पत्रांचे वाटप करण्यात आले, ज्यामुळे संघर्षानंतर या कुटुंबांना हक्काचा आधार मिळाला आहे.

जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या शिफारशीनुसार, सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, शासकीय वसतिगृहे आणि निवासी शाळांमधील रिक्त पदावर या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये शारदा मांदळे (पहारेकरी), संगिता रंजवे (शिपाई), रमा लाटे (पहारेकरी), साईनाथ कसारे (शिपाई), साईनाथ जाधव (सफाईगार), विशाल खरात (शिपाई), दिपक जाधव (शिपाई) आणि पंकज पाटोळे (शिपाई) या आठ जणांचा समावेश आहे. आपल्या कुटुंबातील कर्ता व्यक्ती गमाविल्याचे दुःख बाजूला सारून शासकीय सेवेच्या माध्यमातून सन्मानाने जगण्याची नवी उमेद या वारसांच्या चेहऱ्यावर यावेळी दिसून आली. तसेच सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून घेतलेला हा निर्णय पीडित कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी महत्त्वाचा टप्पा असल्याचे दिसून येत आहे.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या हस्ते हे नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी नवनियुक्त उमेदवारांचे अभिनंदन करत त्यांना भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व प्रशासकीय कामात सचोटीने योगदान देण्याचे आवाहन केले. याप्रसंगी विशेष अधिकारी स्नेहल मोदाळे, समाजकल्याण निरीक्षक अनिल सुनगत यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समिती बैठक संपन्न

**जालना । प्रतिनिधी**



जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या वाढत्या गैरवापराला आळा घालण्यासाठी जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक आज अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या अध्यक्षेत संपन्न झाली. यावेळी बैठकीस जिल्हा रुग्णालयाचे डॉ. पी. एम. कुलकर्णी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे संजय ताकवाले, कृषी अधीकारी सचिन पांचाळ, समाज कल्याण विभागाचे एल.बी. बारगिरे सहायक आयुक्त अन्न व औषध प्रशासनचे जीवन जाधव, नायब तहसिलदार शैलेश राजमाने, पोलीस निरिक्षक पंकज जाधव, सपोनि सचिन इंगेवाड यांची उपस्थिती होती.

जिल्हास्तरीय बैठकीत अमंली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीच्या माध्यमातून विविध विभागांना समन्वयाने काम करण्याचे निर्देश देत अपर जिल्हाधिकारी श्री. मिसाळ म्हणाले की, अवैध पद्धतीने गावठी दारू व अमली पदार्थांची निर्मिती व विक्री रोखण्यासाठी कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर पोलिसांनी तातडीने कारवाई करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, असे स्पष्ट करण्यात आले. तसेच महसूल विभागाने पोलीस कारवाई दरम्यान आवश्यक ती मदत करावी, असेही सांगण्यात आले. अन्न व औषध प्रशासनाला ग्रामीण भागातील वैद्यकीय दुकाने व दवाखान्यांवर नियमित तपासणी करून औषधांचा गैरवापर रोखण्याचे निर्देश देण्यात आले. विशेषतः 'एच वन' (क१) गटातील औषधांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच संबंधित दुकाने व डॉक्टरांचे परवाने रद्द करण्याबाबतही सूचना अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी दिल्या. शिक्षण विभागाने शाळा व महाविद्यालयांमध्ये अमली पदार्थांविरोधात जनजागृती मोहीम राबवावी, विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करावी, असे सांगण्यात आले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या थेट कर्ज योजनेसाठी ३० मार्च रोजी लॉटरीने निवड

**जालना । प्रतिनिधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजनेच्या प्रतीक्षेत असलेल्या अर्जदारांमधून जालना जिल्हा कार्यालयामार्फत लाभार्थ्यांची अंतिम निवड आता लॉटरी पद्धतीने केली जाणार आहे. ही निवड प्रक्रिया निवासी उपजिल्हाधिकारी तथा लाभार्थी निवड समितीचे अध्यक्ष शशिकांत हदगल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. हा कार्यक्रम दि. ३० मार्च २०२६ रोजी दुपारी १२ वाजता जालना येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात संपन्न होणार आहे. महामंडळाच्या जालना जिल्हा कार्यालयाला मुख्यालयाकडून एकूण ४० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते. या योजनेसाठी स्थानिक प्रसारमाध्यमांतून प्रसिद्धी दिल्यानंतर जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्राप्त झालेल्या एकूण १६२ अर्जांची छाननी केल्यानंतर, त्यापैकी १४४ अर्ज पात्र ठरले असून १८ अर्ज तांत्रिक कारणास्तव अपात्र ठरविण्यात आले आहेत. पात्र ठरलेल्या या १४४ उमेदवारांमधून केवळ ४० लाभार्थ्यांची निवड पारदर्शकपणे लॉटरी पद्धतीने केली जाईल. निवडीमध्ये पूर्ण पारदर्शकता राहावी, यासाठी ही जाहीर सोडत काढण्यात येणार आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जालना येथे अर्जदारांच्या उपस्थितीत ही पारदर्शक निवड प्रक्रिया पार पडणार आहे. तरी निवड प्रक्रियेवेळी पात्र अर्जदारांनी वेळेवर उपस्थित राहावे. असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक आर.एन.पवार यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# लोकचळवळीने महाराष्ट्र व्यसनमुक्त करूया - मंत्री संजय शिरसाट

**मुंबई । प्रतिनिधी**



नवी पिढी ही देशाची संपत्ती आहे. मात्र, काही तरुण व्यसनामध्ये गुंतले आहेत. तरुण पिढीला व्यसनामुळे बरबाद होण्यापासून वाचविण्यासाठी लोकसहभाग महत्वाचा आहे. यासाठी राज्यभर लोकचळवळ उभी करून महाराष्ट्र व्यसनमुक्त करूया, असे आवाहन सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केले. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या वतीने २०२० ते २०२५ या काळात व्यसनमुक्तीसाठी उत्कृष्ट काम केलेल्या संस्था, व्यक्ती यांना राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. यानिमित्त आज गेट ऑफ इंडिया ते यशवंतराव चव्हाण सेंटरपर्यंत व्यसनमुक्ती दिंडी काढण्यात आली. व्यसनमुक्ती दिंडीला मंत्री शिरसाट यांनी गेटवे ऑफ इंडिया येथे हिरवा झेंडा दाखवला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, उपायुक्त बाळासाहेब सोळंकी, स्मिता अंबावडेकर यांच्यासह राज्य नशामुक्ती मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री शिरसाट म्हणाले की, व्यसनमुक्त दिंडीचा थेट कार्यक्रम होत असल्याने समाजातील इतर घटक, युवक स्फूर्ती घेतील. व्यसनमुक्त महाराष्ट्रासाठी त्यांच्या मनामध्येही काहीतरी करण्याची इच्छा निर्माण व्हावी. याचप्रमाणे राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त संस्था, व्यक्तींचे कार्य महाराष्ट्रभर जाण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. युवकांमध्ये व्यसनाचे प्रमाण वाढत आहे. आपण शिक्षणामध्ये आघाडीवर आहोत, मात्र व्यसनाधीन होऊ नका, युवकांना संदेश देत नशामुक्त भारत अभियानामध्ये भाग घेऊन महाराष्ट्र नशामुक्तमध्ये प्रथम क्रमांकावर राखण्याची ग्वाही प्रधान सचिव कांबळे यांनी दिली.


व्यसनमुक्त दिंडीमध्ये ढोल पथक, लेझीम पथक, वारकरी, कोळी बांधव, व्यसनमुक्त पुरस्कारार्थी, एनएसएस विद्यार्थी, ब्रह्माकुमारी, तृतीय पंथीय समूह सामील झाले होते. एक दो एक दो, दारू-तंबाखू छोड दो, व्यसनमुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, अशा घोषणा देत दिंडी यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पोहोचली. यावेळी नशामुक्ती संघटनेचे मुख्य समन्वयक अमोल मडावी यांनी नशामुक्तीची शपथ दिली.

# भोंदूबाबाचा काळा चेहरा: शेकडो महिलांचे शोषण, शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावल्याचा संशय

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याला पोलिसांनी पकडल्यानंतर आता त्याचे काळे कारनामे एक-एक करुन समोर येत आहेत. अशोक खरात याने १०० पेक्षा जास्त महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा संशय आहे. मात्र, याच अशोक खरातने नाशिक जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना देशोधडीला लावल्याची नवी माहितीही आता समोर येत आहे.

नाशिक, सिन्नर, शिर्डी आणि राहता या ठिकाणी शेकडो कोटींचा स्थावर मालमत्ता जमवणाऱ्या खरातने शेतकऱ्यांची फसवणूक केली होती, अशी माहिती समोर आली आहे. खरात याने शिर्डी परिसरात मोठ्याप्रमाणावर मालमत्ता खरेदी केल्या होत्या. शिर्डीतील एका आर्थिक विवंचनेत सापडलेल्या कुटुंबाला अशोक खरातने कर्ज म्हणून पैसे दिले होते. या कुटुंबाच्या मालकीचे एक लॉन्स होते. यावर अशोक खरात याचा डोळा होता. या कुटुंबाने अशोक खरात याचे कर्ज फेडल्यानंतरही त्याने त्यांच्याकडे पैशांसाठी तगादा लावला होता. अशोक खरात या कुटुंबाला सातत्याने धमकावत होता. आपल्या मंत्री, बडे सरकारी अधिकारी आणि पोलिसांशी ओळखी असल्याचे तो सांगायचा. अखेर या कुटुंबाने या त्रासाला कंटाळून शिर्डीतील लॉन्स खरातच्या नावावर करुन दिला. मात्र, दरम्यानच्या काळात खरातच्या त्रासाला कंटाळून या कुटुंबातील दोघांनी आत्महत्या केली होती. अशोक खरात याने अशाचप्रकारे त्रास देऊन अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावल्याचे सांगितले जाते.



याशिवाय, नाशिक शहरातील गौळणे भागात कैलास जाधव या शेतकऱ्याने एका जागेचा व्यवहार केला होता. या व्यवहाराचे साठे खतही झाले होते.

मात्र, अशोक खरातला ही जमीन आवडल्याने त्याने परस्पर ही जमीन खरेदी केली. या व्यवहारात संबंधित शेतकऱ्याची ४७ लाख रुपयांची फसवणूक झाली. त्यामुळे शेतकरी कैलास जाधव यांनी न्यायालयात धाव घेतली होती. अनेक दिवसांच्या सुनावणीनंतर न्यायालयाकडून या जमीन खरेदी व्यवहाराला स्थगिती मिळण्याची दाट शक्यता दिसत होती. मात्र, त्यापूर्वीच कैलास जाधव यांना अपघाती मृत्यू झाला होता. या मृत्यूमागे घातपात असावा, असा संशय जाधव कुटुंबीयांना आहे.

# 'मिशन लक्ष्यवेध' अंतर्गत मुंबई विभागीय क्रीडा निपुणता केंद्रासाठी निवड चाचण्या जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत मिशन लक्ष्यवेध अंतर्गत मुंबई विभागीय क्रीडा निपुणता केंद्रासाठी खेळाडूंची निवड प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर सहभाग घेतलेल्या २५ वर्षाखालील खेळाडूंनी ३१ मार्च २०२६ पर्यंत https://forms.gle/2f7ypkikdUBKN7F- यावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावे, असे आवाहन मुंबई शहरच्या जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दिले आहे.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश राज्यातील गुणवंत खेळाडूंना उच्च दर्जाचे प्रशिक्षण, आवश्यक सुविधा व मार्गदर्शन उपलब्ध करून देत राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी घडवणे हा आहे. या उपक्रमांतर्गत वेटलिफ्टिंग, लॉन टेनिस, शूटिंग व टेबल टेनिस या क्रीडा प्रकारांसाठी विभागीय स्तरावर निवड चाचण्या आयोजित करण्यात आल्या आहेत. निवड प्रक्रियेदरम्यान तज्ञ प्रशिक्षकांमार्फत खेळाडूंचे कौशल्य परीक्षण करण्यात येणार असून निवड झालेल्या खेळाडूंना प्रगत प्रशिक्षण व करिअर मार्गदर्शन दिले जाणार आहे.

तालुका क्रीडा संकुल, कोपरी, ठाणे येथे ६ एप्रिल रोजी सकाळी ८.०० वाजता वेटलिफ्टिंग क्रीडा प्रकाराची निवड चाचणी होणार असून, अधिक माहितीसाठी हिमानी परब ८३९१९६४०४६ यांना संपर्क साधावा. महाराष्ट्र स्टेट लॉन टेनिस असोसिएशन, कुपरेज क्लब, मुंबई येथे ७ एप्रिल रोजी सकाळी ८.०० वाजता लॉन टेनिस क्रीडा प्रकारची निवड चाचणी होणार असून अधिक माहितीसाठी प्रीती टेमकर ९०२२२५०७५८ यांच्याशी संपर्क साधावा. शूटिंग क्रीडा प्रकाराची निवड चाचणी कामगार कल्याण मंडळ, दादर, येथे ०८ एप्रिल रोजी सकाळी ८.०० वा. होणार असून, अधिक माहितीसाठी नेहा साखरे ९८६९१९७०२२ यांना संपर्क साधावा.

# भोंदूबाबाचा पर्दाफाश: लग्नाच्या नावाखाली वृद्धाची फसवणूक

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात सध्या भोंदू बाबा अशोक खरातच्या काळ्या कारनाम्यांची सातत्याने चर्चा सुरु आहे. याप्रकरणावरुन संताप व्यक्त होत असतानाच आता डोंबिवलीमध्येही एका भोंदू बाबाचे पितळ उघडं पडलं आहे. डोंबिवलीतील एका भोंदू बाबाने सर्वसामान्यांच्या श्रद्धेचा फायदा घेत त्यांना लुटल्याचा प्रकार समोर आला आहे. मुलीच्या लग्नातील दोष उतरवण्याच्या नावाखाली एका वयोवृद्ध पित्याची फसवणूक करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. दीपक सावंत (६२) असे या भोंदूबाबाचे नाव असून त्याला विष्णू नगर पोलिसांनी कल्याणमधून बेड्या ठोकल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, डोंबिवलीतील विष्णू नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारे एक वयोवृद्ध गृहस्थ आपल्या मुलीच्या लग्नात वारंवार येणाऱ्या अडचणींमुळे अत्यंत चिंतेत होते. अनेक प्रयत्न करूनही विवाह जुळत नव्हता. त्यामुळे ते मानसिकदृष्ट्या खचले होते. त्यांच्या याच हतबलतेचा फायदा दीपक सावंत याने घेतला. त्याने स्वतःला सिद्ध पुरुष किंवा बाबा असल्याचे भासवून या पित्याची भेट घेतली.

तुमच्या मुलीला कोणाची तरी कडक नजर लागली आहे. घरामध्ये बाधा असून विधी केल्याशिवाय लग्नाचे कार्य पार पडणार नाही आणि मुलीचे भविष्य धोक्यात येईल, अशी भीती त्याने या पित्याच्या मनात घातली होती. पोटच्या मुलीच्या भविष्यासाठी हा पिता या भोंदूच्या जाळ्यात अडकला. यानंतर भोंदू दीपक सावंत याने विधीच्या नावाखाली प्रथम २ हजार रुपये दक्षिणा घेतली. त्यानंतर मुख्य विधी करण्यासाठी त्याने काही अटी घातल्या.

मला दागिन्यांचा विधी करायचा आहे, असे सांगून त्याने पीडिताला सोन्याचे ब्रेसलेट आणि चांदीची लक्ष्मीची नाणी घेऊन येण्यास सांगितले. विधी सुरू असताना त्याने हे सर्व दागिने एका लाल रुमालात बांधले. मंत्रोच्चाराचे नाटक करून त्याने पीडिताचे लक्ष विचलित केले. यानंतर अत्यंत सराईतपणे त्याने दागिन्यांचा रुमाल आपल्या झोळीत टाकला आणि त्याऐवजी हुबेहूब दिसणारा, पण आतमध्ये दागिने नसलेला दुसरा लाल रुमाल पीडिताच्या हातात सोपवला. हा रुमाल देवाच्या कोनाड्यात ठेवा आणि सहा महिन्यांनीच उघडा, तरच विधी पूर्ण होईल, अशी ताकीद देऊन तो घाईघाईने तेथून पसार झाला.



तो आरोपी भोंदू बाबा निघून गेल्यावर पीडिताला काहीतरी काळं-बेरं असल्याचा संशय आला. त्यांनी तो रुमाल उघडून पाहिला असता, त्यात दागिने नसल्याचे पाहून त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यांनी तात्काळ विष्णू नगर पोलीस ठाणे गाठले. वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली दोन विशेष पथके तैनात करण्यात आली. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी अवघ्या काही तासांत दीपक सावंत याला कल्याण परिसरातून ताब्यात घेतले.

पोलिसी खाक्या दाखवताच आरोपीने आपला गुन्हा कबूल केला. यावेळी तपासात काही धक्कादायक बाबीही समोर आल्या. आरोपी दीपक सावंत हा सराईत भामटा असून, त्याच्यावर मुंबई आणि टिटवाळा पोलीस ठाण्यातही अशाच प्रकारचे फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत. तो वेगवेगळ्या नावांनी वावरत असे. विशेषतः वृद्ध व्यक्ती किंवा गरजू महिलांना आपले लक्ष बनवत असे. पोलिसांनी आरोपीला कल्याण सत्र न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला २७ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

विष्णू नगर पोलिसांनी या घटनेच्या निमित्ताने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. शिक्षित समाजातही अजूनही अंधश्रद्धेचा फायदा घेऊन लुटले जाण्याचे प्रकार घडत आहेत. कोणत्याही व्यक्तीने दैवी शक्तीचा दावा करून पैसे किंवा दागिने मागितल्यास त्यावर विश्वास ठेवू नका. अशी फसवणूक झाल्यास लाजू नका, तर तातडीने पोलिसांकडे तक्रार करा, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड, मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**